


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६४६. वा | मंगळवार | दि. ०९ जानेवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# मॅटच्या निर्णयानंतर जिल्हा महसूल विभाग एव्हढा निष्क्रिय का?...

## टेकाळेंची बदली योग्य असून देखील महसूल अधिकाऱ्यांची आळीमिळी गुपचिळी...

## कर्तव्यदक्ष महसूल आयुक्तांकडून लवकरात लवकर कारवाईची अपेक्षा...

**जनसंचलन/बुलढाणा**

महसूल विभागातील सर्वाधिक भ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांची मोताळा येथे करण्यात आलेली बदली नुकतीच मॅटने रद्द केली व त्यांना बुलढाण्यातच कायम ठेवण्याचा निर्णय दिला. खरे तर हा निर्णय जिल्हा महसूल प्रशासनाच्या विरोधात गेलेला आहे. त्यामुळे त्यावर महसूल प्रशासनाकडून योग्य ती कार्यवाही अपेक्षित होती. परंतु अद्यापही महसूल प्रशासनात या मुद्यावरून ढिम्मपणा दिसून येतो आहे. त्यामुळे ही लढाई टेकाळे आणि महसूल प्रशासनात नूराकुश्ती तर नव्हती ना, असे आता अनेकांना वाटू लागले आहे. टेकाळेंवर कारवाई करण्यात जिल्हा महसूल विभाग फार कमी पडत असल्याने आता महसूल आयुक्त कार्यालयातूनच योग्य ती कारवाईची अपेक्षा उरलेली आहे. जिल्हा महसूल प्रशासनात कार्यरत राहून विविध पातळ्यांवर भ्रष्टाचाराचे विक्रम प्रस्थापित करणाऱ्या विजय दत्तात्रय टेकाळे यांच्या विरोधात गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणात तक्रारी येत आहेत. टेकाळेंचे विविध पातळ्यांवरील भ्रष्टाचार, त्या भ्रष्टाचारातून जमवलेली प्रचंड अवैध संपत्ती/अपसंपदा, हे अत्यंत कळीचे मुद्दे आहेत. खरे तर टेकाळे यांनी जे काही भ्रष्टाचाराचे विक्रम केले आहेत आणि जी काही करोडो रुपयांची संपत्ती/अपसंपदा आजवर जमवलेली आहे, ते पाहता त्यांच्यावर तात्काळ कठोर फौजदारी कारवाई आणि सेवेतून बडतर्फीची कारवाई अपेक्षित आहे. परंतु त्यांच्यावर कुठलीही कारवाई होताना दिसत नाही. महसूल विभागातील वरिष्ठ अधिकारी केवळ कागदी घोडे नाचवण्याचे काम करीत आहेत. दुसरीकडे केवळ चौकशीचा फार्स केला जात आहे. महसूलचे अधिकारी वाट्टेल त्या थराला जाऊन टेकाळे यांना वाचवण्याचा प्रयत्न करीत आहेत. जे काम महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी करणे अपेक्षित आहे, ते काम दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज करीत आहे. दैनिक जनसंचलन ने सातत्याने टेकाळे यांच्या भ्रष्टाचारावर पुराव्यांनिशी प्रकाश टाकला आहे व त्यांचा हा भ्रष्टाचार सगळ्या जगासमोर उघडा-नागडा केला आहे. विशेष बाब ही टेकाळे यांच्याविरोधात अनेक तक्रारी होऊन देखील जिल्हा महसूल प्रशासन प्रत्येक तक्रारीकडे ठरवून कानाडोळा करीत आहे. कुणाच्याही तक्रारीवर योग्य ती कारवाई होताना दिसत नाही. एका सरकारी अधिकाऱ्याचा विशिष्ट कालखंड संपला की, त्याची बदली होणे क्रमप्राप्त आहे. परंतु टेकाळे यांना हा नियम लागू होत नाही. टेकाळे हे वर्षानुवर्षे एकाच जागेवर, एकाच कार्यालयात कार्यरत राहू शकतात. तसे विक्रम यापूर्वीही टेकाळे यांनी केले आहेत. अनेक जणांच्या तक्रारी सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनचा पाठपुरावा याच्या दबावापोटी काही महिन्यांपूर्वी टेकाळे यांची बदली मोताळा येथे करण्यात आली होती. खरे तर टेकाळेंची झालेली बदली ही कुठेही नियमबाह्य दिसून येत नाही. जी कार्यवाही झालेली आहे, ती योग्यच आहे. परंतु ज्या ठिकाणी अनिर्बंध भ्रष्टाचार केलेला आहे, ते कार्यालय आणि ते पद सोडायचे कसे, हा विचार करून विजय दत्तात्रय टेकाळे यांनी बदलीच्या विरोधात मॅट कडे अपील दाखल केले. मॅटमध्ये अनेक दिवस केस चालली. त्यानंतर मॅटने निर्णय दिला की, टेकाळे यांची करण्यात आलेली बदली ही नियमबाह्य आहे व त्यांना आहे त्याच ठिकाणी कायम ठेवावे. आम्हाला नाही माहिती की हा निर्णय देण्यापूर्वी मॅटने कोण-कोणत्या मुद्द्यांचा सारासार विचार केला. परंतु या निर्णयानंतर काही माध्यमांमध्ये ज्या बातम्या आल्या, त्यातून हे स्पष्ट होते की, टेकाळे यांच्यावर अन्याय झाला व प्रशासनाने हा अन्याय केला. यानंतर खरे तर जिल्हाधिकारी असो की महसूलमधील वरिष्ठ अधिकारी. यांनी यासंदर्भात योग्य तो खुलासा करून उचित कार्यवाही करणे अपेक्षि होते. मात्र, आधीपासूनच टेकाळेंच्या बाबतीत अत्यंत मरणासन्न झालेल्या महसूल प्रशासनाने अद्यापही याबाबत योग्य तो निर्णय घेतलेला नाही. खरेतर या प्रकरणात महसूल विभागाची बाजू योग्य असून देखील मॅटच्या या निर्णयाच्या विरोधात महसूल प्रशासन एव्हढे उदासीन का आहे, हा महत्वाचा प्रश्न आहे. स्थानिक महसूस प्रशासनाच्या आजवरच्या ढिसाळ आणि गलथान कारभारानंतर ही बाब निश्चित




आहे की, टेकाळेंवर स्थानिक महसूल प्रशासन काहीही कारवाई करणार नाही. त्यामुळे आता महसूल आयुक्त कार्यालय अमरावती येथूनच सूत्रे हालणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने महसूल आयुक्त कार्यालयात हालचाली देखील होत आहेत. मात्र, या हालचालींना गती येणे गरजेचे आहे. कारण जोपर्यंत टेकाळे यांच्यावर कारवाई होत नाही, तोपर्यंत एका भ्रष्टाचाऱ्याला अभय दिल्यासारखे होईल. टेकाळेंवर तात्काळ कारवाई अपेक्षित आहे. ही कारवाई आता नेमकी होईल कधी, याचे उत्तर तर काळाच्या उदरातच दडलेले आहे. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज कोणतेही भविष्य वर्तवत नाही. परंतु महसूल विभागातील भ्रष्टाचारी कीड संपवण्यासाठी टेकाळेंसारख्यांवर कारवाई अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी आगामी काळात सातत्याने प्रयत्न केले जातील, यात काही शंका नाही.

**अजून बरेच काही पुढील सत्रात...**

## महाराष्ट्र राज्यात झालेल्या तलाठी भरतीच्या निकालात झालेल्या तफावती बद्दल तिव्र निषेध...

**जनसंचलन/ खामगाव**

नुकत्याच झालेल्या तलाठी भरतीच्या परीक्षेचे निकाल लागलेले असून या भरतीच्या निकालामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये तफावत निर्माण झाली आहे २०० मार्कांची परीक्षा असून यामध्ये विद्यार्थ्यांना २०० पेक्षा जास्त मार्क देण्यात आलेले आहे या अगोदर तलाठी परीक्षा पेपर फुटीचा सुद्धा मुद्दा पुढे आलेला होता.महाराष्ट्र सरकारने टीसीएस कंपनीच्या माध्यमातून परिक्षा घेतल्या असून या कंपनीवर कुठलाही सरकारी खात्याचे नियंत्रण नसून ही कंपनी परीक्षा घेत असून विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात घालत आहे तरी सरकारने या कंपनीची सखोल चौकशी करून विद्यार्थ्यांना न्याय देण्यात यावा . तसेच परीक्षा निकालाची पद्धत ही चुकीची दिसून येते परिक्षेचा निकाल नॉर्मलायझेशन नुसार लावला जातो या मध्ये सोप्या प्रश्नांना कमी मार्क व कठीण प्रश्नांना जास्त मार्क देण्यात येतात त्यामुळे त्या एकंदरीत ऍव्हरेज मार्क मध्ये जास्त मार्क पडले जाते त्यामुळे विद्यार्थी परिक्षेच्या निकाला मध्ये भ्रमित होत आहे. राज्य सरकारने नोकरी भरतीवर नियंत्रण ठेवावे.

विद्यार्थ्यांच्या न्यायाची मागणी करीत आहे अन्यथा अखिल भारतीय विद्यार्थी परिषद तीव्र आंदोलन करेल असे मत जिल्हा संयोजक ऋषिकेश वाघमारे,खामगाव नगर मंत्री अनिकेत वरुडकर ,शेगाव नगर मंत्री सचिन काठोळे, राहुल खरात व समस्त कार्यकर्त्यांनी आपली मागणी तह-



सीलदार खामगाव च्या वतीने मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांना निवेदन देण्यात आले आहे. यावेळी तहसिल परिसरात अभाविप च्या वतीने निदर्शने करण्यात आली.

# विकसित राष्ट्र बनविण्यासाठी सर्वांचा सहभाग महत्त्वाचा - केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ. भागवत कराड

**जनसंचलन/बुलढाणा**

समाजातील वंचित घटकांना केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा, यासाठी विकसित भारत संकल्प यात्रा सुरु आहे. या विविध योजनांचा लाभ देत देशाला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनविण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा संकल्प असून, यामध्ये सर्वांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी आज गांधी भवन येथे आयोजित कार्यक्रमात केले.

आमदार संजय गायकवाड, आमदार श्रीमती श्वेता-ताई महाले, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती भाग्यश्री विसपुते, माजी आमदार सर्वश्री चैनसुख संचेती, विजयराज शिंदे व्यासपीठावर उपस्थित होते.

देशाने नुकताच भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला असून, आता अमृतकाल सुरु आहे. या कालावधीमध्ये जग भारताकडे मार्गदर्शक, इतरांचा सन्मान करणारा, मदत करणारा देश म्हणून पाहते आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशाला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र करण्याचा संकल्प केला असून, त्यामध्ये आपल्या सर्वांचे योगदान महत्त्वपूर्ण राहणार असल्याचे डॉ. कराड यांनी सांगितले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी उत्तर प्रदेश, पंजाब, मिझोरम येथील नागरिकांशी संवाद साधला असून, त्यांनी केंद्र शासनाच्या विविध योजनांपासून वंचित असणाऱ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहे. त्यासाठी या रथयात्रेसोबतच विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी जागेवरच नाव नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असल्याकडेही डॉ. भागवत कराड यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले. केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांची डॉ. कराड यांनी यावेळी उपस्थितांना माहिती दिली. कार्यक्रमाला उपस्थित दिव्यांग बांधवाचा उल्लेख करून त्यांच्यासाठी असलेल्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहनही त्यांनी केले. तसेच अमृतकाळात गरीब, महिला, युवावर्ग आणि शेतकऱ्यांचा विकास करण्यावर भर देणार असल्याचे केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ. कराड यांनी सांगितले.

आगामी काळात केंद्र शासनाच्या लोकल्याणकारी योजना सामान्य नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रधानमंत्री सुरक्षा योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती योजना, किसान क्रेडिट कार्ड, मुद्रा योजना, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, रेशन कार्ड, जमीन आरोग्य पत्रिका वितरण, सेंद्रीय शेती, संजय गांधी निराधार अनुदान योजना, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन आदि विविध योजनेच्या माध्यमातून नागरिकांना लाभ देण्यात येत असल्याचे केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ. कराड यांनी सांगितले.

आमदार संजय गायकवाड, आमदार श्रीमती श्वेता-ताई महाले यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देणारे स्टॉलस येथे उभारण्यात आले




होते. या स्टॉलला भेटी देत डॉ. कराड यांनी लाभार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्या हस्ते लाभार्थ्यांना लाभाचे वितरण करण्यात आले. आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना, दीनदयाल अंत्योदय योजना, प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री उज्वला योजना, प्रधानमंत्री विश्वकर्मा, प्रधानमंत्री किसान सन्मान, किसान क्रेडीट कार्ड (केसीसी), प्रधानमंत्री पोषण अभियान, हर घर जल-जल जीवन मिशन, स्वामित्व, जन धन योजना, जीवन ज्योती बीमा योजना, सुरक्षा बीमा योजना, अटल पेन्शन योजना, पीएम प्रणाम आणि नॅनो फर्टीलायझर, प्रधानमंत्री स्वनिधी, प्रधानमंत्री विश्वकर्मा, इ-श्रम कार्ड आदी योजनांची माहिती देण्यात आली.

यावेळी लाभार्थ्यांनी मेरी कहानी मेरी जुबानीमध्ये मिळालेल्या लाभाबाबत मनोगत व्यक्त केले.

## जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा खंडाळा मकरध्वज येथे निघाला कोब्रा साप



**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा खंडाळा मकरध्वज येथे दिनांक ८ जानेवारी २०२४ वार सोमवार ला शिकस्त खोलीमध्ये कोब्रा नाग निघाला

शाळेमध्ये ऐकुन १८० विद्यार्थी असुन भलामोठा साप आणि फणा काढून पाच फुट लांब असलेला नाग ( कोब्रा) विषारी असलेला साप पाहून एकच गोंधळ झाला शाळेच्या वतीने लगेच सर्पमित्र रसाळ सर यांना माहिती दिली . व सर्व विद्यार्थी सुरक्षित ठिकाणी ठेवले . वेळेची तत्परता पाहून सर्पमित्र रसाळ साहेब बुलढाणा यांनी त्वरित खंडाळा मकरध्वज येथे येऊन कोब्रा नागाला पकडले व भरणी मध्ये बंद केले तेव्हा विद्यार्थ्यांची भिती दुर झाली . रसाळ साहेब यांना विदर्भ कोकण ग्रामीण बँक मधील शाखा व्यवस्थापक साहेब यांनी वेळेची तत्परता पाहून तसेच १८० विद्यार्थी संकाटात असुन सर्पमित्र यांना थोड्या वेळासाठी सुट्टी दिली त्याबद्दल माननीय व्यवस्थापक राजपूत साहेब यांचे सुद्धा शाळेच्या वतीने खूप खूप आभार मान्यात आले आहे. रसाळ साहेब यांच्या पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा व त्यांचे सुद्धा शाळेच्या वतीने खूप खूप आभार व्यक्त करण्यात आले आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# महिलांसाठी स्वतंत्र सुरक्षा हेल्पलाईनची गरज- संदीप शेळके...

## शेगावातील महिला मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

जनसंचलन / शेगाव

जिल्ह्यासाठी एक स्वतंत्र महिला सुरक्षा हेल्पलाईन असली पाहिजे. टोलफ्री क्रमांकावर भगिनी आपल्या तक्रारी मांडतील. त्यावर धडक कारवाईसाठी सुसज्ज महिला कमांडचे पथक हवे. यामुळे महिलांवरील अत्याचार थांबतील, असे प्रतिपादन राजर्षी शाहू परिवाराचे अध्यक्ष तथा वन बुलढाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांनी केले. येथील वर्धमान जैन भवनात ७ जानेवारी रोजी आयोजित महिला मेळाव्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सविता झाडोकार होत्या. मंचावर प्रीती शेगोकार, माया दामोदर, अरुणा देशमुख, शीतल शेगोकर, शोभा जवंजाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलतांना संदीप शेळके म्हणाले, स्त्रिया आज कुठेच मागे नाहीत. प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिला कार्यरत आहेत. स्त्रियांनी स्वतःच्या पायावर उभे राहावे, आर्थिक साक्षर व्हावे याकरिता राजर्षी शाहू परिवाराने नेहमीच पुढाकार घेतला आहे. बचतगटांच्या ३५ हजार महिलांना १५० कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे. या माध्यमातून अनेक महिला उद्योजक समोर आल्या याचे समाधान आहे. यावेळी संदीप शेळके यांनी माता- भगिनींशी संवाद साधला. वन बुलढाणा मिशनची भूमिका त्यांच्यासमोर मांडली. मेळाव्याला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद स्त्री सक्षमीकरणाच्या दिशेने टाकलेले हे मोठे पाऊल असल्याचे दिसून आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गोविंद येवले यांनी केले. संचलन व आभार प्रीती सावळे यांनी मानले. जिजाऊंच्या नावाने बचतगटांच्या महिलांच्या उत्पादनासाठी एक ब्रँड असावा. जिल्ह्यातील विधवा, निराधार, दिव्यांग, शेतमजूर महिलांची शासकीय नोंदणी अभियान राबविण्यात आले पाहिजे. महिला आरोग्य अभियान, युवती आवास योजना, बुलढाणा युवती स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आणि स्पोर्ट्स फेस्टिवल, वार्षिक महिला भजनी मंडळ महोत्सव, बुलढाणा वुमेन सिंगिंग व डान्सिंग आयडॉलचे अशी स्पर्धा वर्षातून एकदा आयोजित केली पाहिजे. यामधून




महिलांच्या कलागुणांचा विकास होईल आणि स्पर्धा जिंकण्याची उर्मी वाढेल. वन बुलढाणा मिशनच्या माध्यमातून मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे जिजाऊ स्त्री शक्ती केंद्र उभारण्यात येणार आहे. याद्वारे महिलांना आपल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करता येईल, असा विश्वास संदीप शेळके यांनी व्यक्त केला. महिलांमध्ये बचत, काटकसर, चिकाटी हे नैसगिक गुण आहेत. घेतलेल्या कर्जाची महिला नियमित परतफेड करतात. त्यांचा व्यवहार चोख असतो. महिलांचे एकही कर्जप्रकरण थकीत नाही. त्यामुळे कोणतीही बँक त्यांना कर्ज देण्यास तयार होते. महिलांनी आपल्यातील गुण ओळखावे. त्याचा योग्य वापर करुन प्रगती साधावी. राजर्षी शाहू परिवार कायम आपल्या पाठीशी आहे.

## १७ लाखाच्या गुटख्यासह वाहन जप्त अन्न व औषध प्रशासनाची मोठी कारवाई

जनसंचलन/जळगाव जामोद

मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूर येथून देऊळगावराजा येथे बोलेरो पिकअप वाहनातून नेण्यात येणारा १७ लाख ३३ हजार ७५० रुपयांचा गुटखा अन्न व औषध प्रशासनाने बऱ्हाणपूर मार्गावर असलेल्या तालुक्यातील रसलपूर फाट्याजवळ रविवारी ७ जानेवारी २०२४ रोजी ही कारवाई करण्यात आली. याबाबत मिळालेली माहिती अशी की, गुटख्याच्या वाहतुकीबाबत अमरावती येथील अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने रविवारी ७ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ६.५० च्या सुमारास बऱ्हाणपूर मार्गावरील रसलपूर फाट्याजवळ सापळा रचून या दरम्यान बऱ्हाणपूरहून येणारे बोलेरो पिकअप वाहन (क्रमांक : एमएच २८ - बीबी ६८८७) थांबवून तपासणी घेण्यात आली असता वाहनातून १७ लाख ३३ हजार ७५० रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. तसेच ८ लाख रुपये किमतीचे वाहनही जप्त करण्यात आले. हा गुटखा देऊळगावराजा येथे नेला जात असल्याचे चौकशीत समोर आले. गुटखा वाहतूक करणारा



आरोपी परमेश्वर निर्मळे (रा. देऊळगावराजा) याला सह गुटख्याची वाहतूक वाहन जळगाव जामोद पोलिस ठाण्यात जमा करण्यात आले. पोलिसांनी त्याच्याविरूद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक नारायण सरकटे करत आहेत. ही कारवाई अन्न व औषध प्रशासन विभागाचे संयुक्त दक्षता आयुक्त समाधान पवार, सहाय्यक आयुक्त आनंद महाजन, सह आयुक्त जयपूरकर, सहाय्यक आयुक्त केदारे, अन्नसुरक्षा अधिकारी संदीप सूर्यवंशी, गुलाबसिंग वसावे, रवींद्र सोळंके, देशमुख, पोलिस हेड कॉस्टेबल उमेश शेगोकार, पोलिस नाईक शेख इरफान, पोलिस कॉस्टेबल सचिन राजपूत, पोलिस कॉस्टेबल पहाड, पोलिस कॉस्टेबल रणजीत व्यवहारे यांनी केली.

## राज्यातील सर्व अनुदानित शाळा व संस्थेवर सफाई कर्मचारी यांची कायमस्वरूपी नेमणूक करा

### शेख जहीर यांची जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाव्दारे मागणी...

जनसंचलन/बुलढाणा




राज्यातील संपूर्ण अनुदानित शाळा व संस्थेवर सफाई कर्मचारी यांची नेमणूक करण्यात यावी, तसेच शासन निर्णय काढून त्यामध्ये मुस्लीम मेहतर, भंगी, लालबेगी या जातींचा समावेश करण्यात अशी मागणी शेख जहीर शेख खलील बुलडाणा यांनी ८ जानेवारी २०२४ रोजी जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांच्याकडे एका निवेदनाव्दारे केली आहे. दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, संपूर्ण राज्यातील अनुदानित शाळा व संस्थेवर सफाई कर्मचारी यांची कायमस्वरुपी नेमणुक करण्याबाबत तसेच शासन निर्णय काढून त्यामध्ये मुस्लिम मेहतर, भंगी, लालवेगी या जातिची नेमणुक करण्यात यावी, अशी मागणी करत पुढे नमूद असे की, भविष्यातील संपूर्ण जिवन मान बघता व विद्यार्थ्यांचे आरोग्य लक्षात घेता प्रत्येक शाळा व संस्थेवर साफ सफाई करण्यासोबतच परीसर संपूर्ण स्वच्छ ठेवण्याची गरज असते, जेने करुन परीसरात रोगराई पसरणार नाही, यासाठी सफाई कर्मचारी यांची अत्यंत आवश्यकता असल्या कारणाने संपूर्ण राज्यातील अनुदानित शाळा व संस्थेवर एक सफाई कर्मचारी कायमस्वरुपी देण्यात यावा, अशी मागणी एका निवेदनाव्दारे करण्यात आली असून निवेदनावर शेख जहीर शेख खलील यांची स्वाक्षरी आहे.

## महाराष्ट्राचे नेते मिंधे झालेले आहे पैशांसाठी वेडे झालेत राज ठाकरे सत्ताधा-यांवर बरसले!

वृत्तसंस्था /मुंबई

सहकार परिषद २०२४ या कार्यक्रमात बोलताना राज्य आणि केंद्रातील सत्ताधाऱ्यांवर अप्रत्यक्षपणे घणाघाती टीका केली आहे. आपल्याकडे येणारे प्रकल्प हिसकावले जातात, हजारो एकर जमिनी गिळल्या जात आहेत, मराठी माणसाला आपापसात झुंजवलं जात आहे. महाराष्ट्राच्या विरोधात अनेक महाराष्ट्र-द्रोष्ट्यांची मिळून अशीही एक सहकार चळवळ गेली ७० वर्ष सुरू आहे. पण आपले महाराष्ट्राचे नेते मिंधे झालेले आहेत, पैशांसाठी वेडे झाले आहेत.त्यांना महाराष्ट्राचं सत्व कळत नाही. त्यांना पाठीचा मणका नाही. स्वतःची मनं आणि स्वाभिमान त्यांनी गहाण टाकलेला आहे, असा हल्लाबोल राज ठाकरेंनी केला आहे. देशात सुरू असलेल्या राजकारणावरून निशाणा साधताना राज ठाकरे म्हणाले की, ज्या निष्ठुरपणे देशातील राजकारण सुरू आहे, ज्याप्रकारे न्यायव्यवस्था सुरु आहे. त्यानुसार उद्या ते मुंबईला हात घालायला मागे-पुढे बघणार नाहीत. महाराष्ट्राचे तुकडे करायला, विदर्भ वेगळा करायला वेळ लावणार नाहीत. हे का होतंय? कारण मराठ्यांनी सव्वाशे वर्ष या देशावर राज्य केलंय, महाराष्ट्र स्वतंत्र मताचा प्रदेश आहे. हेच दिल्लीश्वरांना सतत खुपत आलंय, असा आरोपही राज ठाकरे यांनी केला आहे. राज ठाकरे गेल्या काही महिन्यांपासून राज्य आणि केंद्रातील सत्ताधाऱ्यांबाबत मवाळ भूमिका घेत असल्याची चर्चा होत असताना आज मात्र त्यांनी कोणाचंही नाव न घेता जोरदार टीका केली आहे. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ते सत्ताधारी एनडीएविरोधात आणखी आक्रमक भूमिका घेणार का, हे पाहावं लागेल. विविध प्रकल्पांवरून संशय व्यक्त करताना राज ठाकरे यांनी म्हटलं आहे की, माझी रायगडमधील मराठी बांधवांना हात जोडून विनंती आहे, शिवडी-न्हावाशेवा पूल पूर्ण होईल, उद्या इथे विमानतळ होईल तेव्हा रायगड जिल्ह्यातील जमिनी




राखा, इथलं मराठी माणसाचं अस्तित्व जपा. नाहीतर भविष्यात पश्चातापाचा हात कपाळावर मारण्यापलीकडे काहीही उरणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी सांगितलं होतं आपला शत्रू समुद्रमार्गे येईल, समुद्रावर गस्त वाढवा. पण आम्ही बेसावध. महाराष्ट्रात आजपर्यंत झालेल्या सर्व दहशतवादी हल्ल्यातील दहशतवादी समुद्रमार्गेच आले आहेत. ३५० वर्षांपूर्वी महाराजांनी सांगूनही आमचे राज्यकर्ते त्यातून बोध घेत नाहीत. ज्या छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या रक्षणासाठी आरमार उभं केलं. त्यांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या साजरा करायच्या पण त्यांनी सांगितल्याप्रमाणे आपल्या कोकण किनारपट्टीला राखायचं नाही.

# शिवसेना आमदार अपात्रता प्रकरण, बुधवारी होणार निकाल जाहीर, ठाकरे- शिंदेंची धाकधूक वाढली...

**वृत्तसंस्था/मुंबई**

शिवसेनेमध्ये फूट पडून झालेल्या सत्तांतरानंतर रंगलेल्या कायदेशीर लढाईच्या निकालाची घडी समीप आल्याचे दिसत आहे. शिवसेनेतील आमदार अपात्रता प्रकरणाचा निकाल उद्या, बुधवारी (१० जानेवारी) विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर हे जाहीर करणार असून, त्यातील शाब्दिक त्रुटी दूर करण्याचे काम सुरू आहे. निकालातील ठळक मुद्दे बुधवारी विधान भवनात वाचले जातील आणि त्यानंतर सविस्तर निकाल नंतर संबंधित राजकीय पक्षांना कळवला जाईल, असे कळते. सर्वोच्च न्यायालयात झालेल्या न्यायालयीन लढाईच्या निवाड्यात विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे सर्वोच्च न्यायालयाने अपात्रतेचा निकाल देण्याची जबाबदारी सोपवलेली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह त्यांच्या गटातील १६ आमदारांचे राजकीय भवितव्य ठरवणारा हा निकाल बुधवारी दुपारी चार वाजता लागणार असल्याचे समजते.हा निकाल शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या बाजूने लागला तर एकनाथ शिंदे यांचे मुख्यमंत्रिपद अडचणीत येण्याची शक्यता आहे. मात्र, ही शक्यता फारच धूसर आहे. पुढच्या तीन महिन्यांत लोकसभा निवडणुकांना सामोरे जावे लागणार आहे. अशा वेळी राज्यातील युतीचे सरकार या निकालामुळे अडचणीत आल्यास भाजपला याचा जोरदार फटका बसू शकतो. त्यामुळे भाजपने आवश्यक ते सर्व पुरावे देण्याबाबतची आणि त्याद्वारे अपेक्षित निकाल मिळेल याबाबतची ठोस रणनीती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मदतीने आधीपासूनच केली असल्याचे बोलले जात आहे. निकाल एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या बाजूने लागला तर त्यांच्या गटातील सर्व आमदारांवर असलेली अपात्रतेची टांगती तलवार दूर होईल.शिंदे गटाच्या आमदारांच्या अपात्रतेबाबत विधानसभा अध्यक्षांनी ३१ डिसेंबरपर्यंत निर्णय घ्यावा, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. विधानसभा अध्यक्षांकडे जर वेळ नसेल तर आम्ही निर्णय देऊ. गोष्टी अनिश्चित काळासाठी किंवा पुढील निवडणुका जाहीर होईपर्यंत टांगती ठेवता येणार नाही. हा प्रश्न ३१ डिसेंबरपर्यंत सोडवावा. शिवसेनेच्या बंडखोर आमदारांविरुद्धच्या प्रलंबित अपात्रतेची कार्यवाही शेड्यूल १० अन्वये विधानसभा अध्यक्षांच्या अधिकारातून पूर्ण करून ३१ डिसेंबरपर्यंत आदेश जारी करावेत, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र विधानसभेच्या सचिवालयाला दिले होते. सुनावणीदरम्यान प्रतिज्ञापत्रात २९ फेब्रुवारीपर्यंत निर्णय घेण्यात येईल, असे सुरुवातीला म्हटले होते. यावर महाअधिवक्ता तुषार मेहता यांनी, या संदर्भात बैठक झाली असून, २०२४ जानेवारी अखेरीस याबाबत निर्णय घेतला जाईल असे सांगितले होते. हिवाळी अधिवेशन नागपूरला होणार असून नागपूर अधिवेशनात याबबातचे कामकाज चालणार असल्याची माहिती त्यांनी दिली होती. त्यानुसार नागपूर अधिवेशन काळात दोन्ही बाजूच्या आमदारांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या. याबाबत



बुधवारी निकाल देण्यात येणार असताना त्याच्या काही दिवस आधी अर्थात गेल्या आठवड्यात विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांची तब्येत बिघडल्याने आता निकाल पुढे जाणार की काय अशी चर्चा सुरू झाली. त्यात रविवारी नार्वेकर यांनी थेट वर्षावर जात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत त्यांच्यासोबत चर्चा केली. त्यामुळे या भेटीमुळे राजकीय वर्तुळात उलट सुलट चर्चेला तोंड फुटले. आमदार अपात्रेबाबतच या भेटीत चर्चा झाल्याचे बोलले जात आहे. साहजिकच बुधवारच्या निकालाकडे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर देशाचे लक्ष लागले आहे.

## बुलडाणा एसटी विभागाचे विभागीय वाहतूक अधिकारी दिपक साळवे यांचा सेवानिवृत्ती बद्दल सत्कार

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलडाणा एसटी महामंडळाचे विभागीय वाहतूक अधिकारी (आपराध) तसेच बुलडाणा आगाराचे कर्तव्य दक्ष डेपो मॅनेजर दिपक भिमराव साळवे हे उच्चविभूशित असून उच्च राहाणी उच्च विचार असलेले व्यक्तीमत्व राप महामंडळात वाहतूक निरिक्षक म्हणून रूजू झाले पण आपल्या बुध्दीच्या व कर्तव्याच्या जोरावर ते स्थानक प्रमुख, आगारव्यवस्थापक या पदावर उत्कृष्ट कामगीरी करून ते आज रोजी बुलडाणा जिल्हा राज्यपरिवहन विभागीय वाहतूक अधिकारी (आपराध) ह्या पदावरून ३१ वर्ष रापची सेवा करून सेवानिवृत झाले. दिपक साळवे हे मनमिळावू नेहमी हसतमुख स्वभाव कोणताही प्रवासी असो किंवा कर्मचारी यांचे हसतमुखाने स्वगत करणारे प्रत्येकांच्या अडीअडचणी जाणून घेवून त्यावर तोडगा काढणारा अधिकारी म्हणून त्यांची राप महामंडळात ओळख होती. महामंडळात विविध जबाबदाऱ्या संभाळतांना त्यांनी घराकडे कधीच दुर्लक्ष केले नाही त्यांचे कडून एक चांगला गुण घेण्यासारखा आहे आईवडीलांची सेवा हीच ईश्वर सेवा म्हणून वागणारा प्रत्यक्षात अंगी उतरून संभाळ करणारा १०० वर्ष वयाचे वडील व ९५ वर्ष वयाच्या आई ह्या दोघांचा लहान मुलासारखी आज पर्यंत सेवा करीत आहे हा गुण प्रत्येकांनी त्यांचे कडून घेण्यासारखा आहे. नोकरी करून सेवा करणारा मनमिळावू अधिकारी प्रवाशांच्या सेवेसाठी बहुजन हिताय बहुजन सुखाय हे रापचे ब्रिद वाक्य समोर ठेवून प्रत्येकावर प्रेम करणारे मनमिळाऊ स्वभावाचे, अधिकारी कर्मचारी यांचेसी सुमधूर संबंध जोपासणारे, एसटीवर जीवापाड प्रेम करणारे, जन्म दाते पहीले आईवडील व दुसरी जन्मदाती एसटी व प्रवासी हे आपले दैवत अन्नदाते समजून वागणारे नावा प्रमाणे दिप तेजत हसतमुख असणारे रापचे दिपक साळवे आपली रापची सेवा करीत आंबेडकरी चळवळीत सक्रीय असत. एसटी महामंडळात ३१ वर्ष सेवा करून ते सेवेतून निवृत झाले आहे पण ते समाज सेवेतून निवृत्त झाले नाही रापची सेवाकरीत असतांना जन्मतःच आंबेडकरी चळवळीची शिकवण आईवडीलांनपासून मिळाल्यामुळे ह्यांनी नोकरी सोबत एसटी महामंडळात बुलडाणा बस्थानकावर पुढाकार घेवून आंबेडकर जयंती इतर महापूरूषांच्या जयंत्या साजऱ्या करण्यासाठी हीरीने भाग घेणारा सर्व सामान्य कर्मचाऱ्या सारखा भाग घेणारा अधिकारी.बुलडाणा शहरात आंबेडकरी चळवळीचे कार्यक्रम असतील त्या प्रत्येक कार्यक्रमात सहभागी अशा कर्तृत्ववान अधिकाऱ्याचा मानसन्मान सत्कार होणे गरजेचे आहे म्हणून एसटी कास्ट्राईब राप कर्मचारी संघटनेचे मा.राज्यउपाध्यक्ष तथा शासनमान्य पत्रकार संरक्षण समीतीचे जिल्हा कार्यध्यक्ष पत्रकार बाबासाहेब जाधव यांनी त्याचा छोटेखानी कार्यक्रम आयेजीत करून त्यांना व त्यांच्या प्रत्येक कामात सहभागी असणाऱ्या त्यांच्या पुर्णीगीनी दर्पनताई साळवे यांचा पुष्प गुच्छ, शाल व महाकारूणीक भगवान गौतम बुध्दाचा बुध्द आणि त्याचा धम्म हा ग्रंथ देवून त्यांचा अंतःकरणातून बाबासाहेब जाधव व से.नि. शिक्षण विस्तार अधिकारी विमल जाधव यांनी सत्कार केला

## दुःखद निधन वार्ता..

**जनसंचलन/बुलढाणा**

आरटीओ विभागात कार्यरत असलेले श्री गजानन तनपुरे साहेब यांच्या मातोश्री श्रीमती सुभद्राबाई अश्रुजी तनपुरे यांचे दि ८/१/२३ रोजी दुःखद निधन झाले आहे अंत्यविधी किन्ही ता लोणार येथे दि ९/१/२३ रोजी सकाळी ११ वाजता ठेवण्यात आला आहे श्री गजानन तनपुरे साहेब यांच्या मातोश्री श्रीमती सुभद्राबाई अश्रुजी तनपुरे यांचा दिनांक ०८/०१/२०२४ रोजी ठीक साडेदहा वाजता साईनगर बुलढाणा येथे वृद्ध काळाने निधन झाले. त्यांच्या अंत्यविधीचा कार्यक्रम दिनांक ०९/०१/२०२४ रोजी सकाळी अकरा वाजता किनी लोणार येथे ठेवलेला आहे. तरी याची सर्व संबंधित नोंद घ्यावी.

बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार

डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

बॉक्स

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याना वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी

| Size | Rates | Height | Width |
|---|---|---|---|
| 8x8 cm | 1 Month=5000/- 15 Day=3500/- 7 Day=2000/- | Hight 8 cm | Width 8 cm |
| 5x8 cm | 1 Month=3500/- 15 Day=2200/- 7 Day=1500/- | Hight 5 cm | Width 8 cm |
| 5x8 cm | 1 Month=3500/- 15 Day=2200/- 7 Day=1500/- | Hight 5 cm | Width 23 cm |

एक दिवसाची जाहिरातः वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.

One Day
Full Page= 8000/-
1/2 Page= 5000/-

| Rate | Height | Width |
|---|---|---|
| 2600/- | Hight 12 cm | Width 12 cm |
| 1800/- | Hight 8 cm | Width 10 cm |
| 1300/- | Hight 8 cm | Width 8 cm |

T & C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी
केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रक्मेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही निःशुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस
फक्त ५०० रुपये

अधिक माहितीसाठी संपर्क:
अजय राजगुरे-9922359674
ऑफिस नं.-9129582958
पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा
Mail Id: jansanchlan@gmail.com